साप्ताहिक लोकप्रभा

लोकसत्ता
६ ऑगस्ट २०१०






Advertise with us



राजू परुळेकर



सरकारी कार्यालयांत आपल्यापैकी कोणी सामान्य जातो तेव्हा मनातल्या मनात एक तर तो खून करतो किंवा आत्महत्या. कनुंमध्ये ७८ व्या वर्षी आत्महत्या करण्याएवढा आत्मसन्मान होता, जो आपल्यात नाही. त्यांनी केलेली आत्महत्या ही आपली सगळ्यांची आत्महत्या आहे.

# कनु (व्लादिमीर) सन्याल!



कनु सन्याल हे एक असं जीवन जगले की जे जीवन कुणालाही जगावंसं वाटेल किंवा कुणालाही जे जगणं आवडणार नाही. खरंतर ही परस्परविरोधी विधानं आहेत. पण ती खरी आहेत. १९३२ साली जन्माला आलेला (ज्या वेळी स्टॅलिन फार जोरात होता) आणि अखेर २०१०च्या २३ मार्चला आत्महत्या करून आपला शेवट करून घेणारा नेता हीच सन्याल यांची खरी ओळख आहे.

भूक, गरिबी, उपासमार, भोवतालचा भ्रष्टाचार पाहून आजही कुणाचंही मन पेटून उठतं.

पण व्लादिमीर इल्यिच उल्यानेव (लेनिन) यांनी असं म्हटलंय की, व्यवस्थेच्या विरुद्ध पेटून उठणाऱ्या कोणत्याही क्रांतिकारक बनू पाहणाऱ्या माणसाच्या मागे संघटना नसेल तर ती व्यक्ती व्यवस्थेकडून नष्ट होते. स्वत: लेनिन यांचा मोठा भाऊ अलेक्झांडर हा झारच्या खुनाच्या कटात गोवला गेल्याने असाच फासावर गेला होता. कनू सन्यालनी भारतात लेनिनचं अप्रत्यक्ष अनुयायित्त्व पत्करलं. ते कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य बनले. कम्युनिस्ट पार्टीच्या दृष्टीने तो वादळी काळ होता. १९६२ साली कम्युनिस्ट चीनने भारतावर हल्ला केला होता. तेव्हा आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा भाग म्हणून चीनची बाजू घ्यायची की भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीने कौल द्यायचा हे ठरत नव्हतं. त्या मानसिक द्वंद्वावर मार्क्सने वा लेनिनने उत्तर लिहून ठेवलं नव्हतं! १९६४ साली या मुद्दय़ाचा संदर्भ घेऊन इतर अनेक मुद्दय़ांवरून कम्युनिस्ट पक्षाची दोन शकलं झाली. त्यातल्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) गटासोबत कनू सन्याल आणि त्यांचे सहकारी चारू मुजुमदार गेले. परंतु केरळ व पश्चिम बंगालमध्ये सरकार आल्यावर आणि पार्टीने लोकशाही पद्धतीने आपला लढा चालू ठेवल्यावर कनू सन्यालना पार्टी क्रांतीच्या दिशेने म्हणजे मुख्यत्वेकरून सशस्त्र क्रांतीच्या दिशेने वाटचाल करत नाही असं आढळून आलं. निदान तो त्यांचा निष्कर्ष होता. सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्या वादळी काळात कनु सन्यालना माओ झेटॉंग यांचा आशियाई उपखंडात उपयुक्त ठरणारा मार्क्सवादी विचार पटत होता. कारण रशियात झालेल्या क्रांतीपेक्षा चीनमध्ये झालेली क्रांती ही भारतीय वातावरणाला अधिक अनुकूल होती. अशा पद्धतीचं काही आपल्याकडे व्हायला पाहीजे असं सन्यालना वाटायला लागलं होतं. ते आणि चारू मुजुमदार हे दोघे दार्जिलिंगच्या दोरांच्या भागातले. तिथेच नक्षलबाडी हे गाव येतं. १९६७ मध्ये कनु सन्याल यांनी एक स्वप्न पाह्यलं. सामान्य शेतकरी आणि सामान्य जनता उठाव करेल आणि भारतीय लष्कर त्याला पाठिंबा देईल, ज्यायोगे भारत हे खरंखुरं लोकांचं संघराज्य होईल अशी ती कल्पना होती. २५ मे १९६७ रोजी ही संधी नक्षलबाडीमध्ये कनु सन्यालांना (चारू मुजुमदारांसहित) मिळाली. तिथल्या मोठय़ा जमीनदारांनी छोटय़ा शेतकऱ्यांवर आपल्या गुंडांकरवी हल्ला चढवला. त्यांना शेतीहीन बनवून त्यांची जमीन ताब्यात घ्यायला सुरुवात केली. तो एक बिंदू होता ज्या क्षणाची कनु सन्याल वाट पाहत होते. चारु मुजुमदारांना सोबत घेऊन त्यांनी ऑल इंडिया कोऑर्डिनेशन कमिटी ऑफ कम्युनिस्ट रिव्होल्यूशनिस्ट. शेतकऱ्यांचा हा उठाव पुढे सरकत गेला. अख्खा पश्चिम बंगाल त्या उठावाने रोमांचित झाला होता. माकप तेव्हा सत्तेमधला भागीदार होता. नंतर ज्योती बसूंच्या पक्षाच्या रूपाने ते सत्तेत आले.

आज नक्षलवाद असं म्हणणाऱ्यांना शंभरातल्या नव्याण्णवांना मूळ नक्षलवाद काय आहे, हे माहीत नसतं. त्या काळात पश्चिम बंगालमधल्या विद्यापीठांपासून ते रस्त्यांपर्यंत हा नक्षलवाद पसरत गेला. प. बंगालच्या रस्त्यांवर अभूतपूर्व मोर्चे निघाले. कनु सन्याल तेव्हा हेवा वाटावा असे हिरो बनले. 'कनु का निकला तीर, व्लादिमीर व्लादिमीर' अशी घोषणा असंख्य बुद्धिमंतांना मोहीत करती झाली. व्लादिमीर म्हणजे लेनिन! कनु सन्याल हे भारताचे लेनिन बनले. थेट माकपच्या विरोधात जाऊन.

साहित्यिक ते शास्त्रज्ञ सगळेजण कनु सन्यालनी रचना केलेल्या नक्षलवादी उठावामुळे स्वत:च्या आयुष्यावर प्रश्नचिन्ह उठवू लागले. महाश्वेतादेवींच्या 'हजार चौरासीर मा' या पुस्तकात किंवा 'हजारो ख्वाइशें ऐसी' या सुधीर मिश्रांच्या चित्रपटात या साऱ्या काळाचं एक दर्शन होतं. सरकारने संपूर्ण मोहीम चिरडून टाकण्याचा निश्चय केला. चारू मुजुमदारांना १६ जुलै १९७२ रोजी अटक करण्यात आली आणि २८ जुलै १९७२ रोजी त्यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला. अलिपूर इथल्या तुरुंगात त्यांना आलेला मृत्यू संशयास्पद होता. त्या अगोदरच कनू सन्यालना १९७० मध्ये तुरुंगात डांबण्यात आलेलं होतं. नक्षलवादी चळवळीच्या पहिल्या टप्प्यांचं दमन अशा पद्धतीने करण्यात आलं.

कनु सन्याल त्यानंतर सात वर्षे तुरुंगात होते. १९७७ साली 'ऑल इंडिया कोऑर्डिनेशन कमिटी ऑफ कम्युनिस्ट' या गटाची स्थापना केल्याबद्दल त्यांना माकपमधून काढण्यात आलं. तेव्हा २२ एप्रिल १९७७ रोजी (२२ एप्रिल हा लेनिनचा वाढदिवस) कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट)ची स्थापना कनु सन्यालनी केली. या पक्षानेच पुढे नक्षलवादी चळवळीचं नेतृत्व केलं.

कनु सन्याल जेलमधून १९७७ मध्ये मुक्त झाले. मुक्त झाल्यावर भारताची एकंदर परिस्थिती बदलली होती. त्या बदलत्या परिस्थितीला पुन्हा एकदा सामोरे जाताना वेगळ्या प्रकारे काही करावे म्हणून त्यांनी 'ऑर्गनायझिंग कमिटी ऑफ कम्युनिस्ट रिव्होल्युशनरीज्' ह्या एका नव्या संघटनेची स्थापना केली. तेव्हा कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) ने त्यांना प्रतिक्रियावादी म्हणून घोषित केलं. सशस्त्र क्रांतीचा मार्ग हा खरा मार्ग नव्हे असं तुरुंगातून सुटल्यावर कनु सन्याल यांनी म्हटले. कनु सन्यालसारख्या सशस्त्र क्रांतीच्या प्रणेत्याने असा विचार करणं आश्चर्यकारक होतं. सात वर्षे त्यांनी तुरुंगामध्ये कोणत्या प्रकारचा विचार केला ते कळायला मार्ग नाही. त्यांना ज्या पद्धतीने तुरुंगात वागवले गेले असेल त्याचा आपल्याला अंदाज येणार नाही.

गंमत म्हणजे नक्षलवादी चळवळ दुसऱ्या टप्प्यात कोंडापल्ली सीतारामय्या ह्यांनी वाढवली त्या आंध्रप्रदेश मधल्या विशाखापट्टणममधल्या जेलमध्ये कनु सन्याल यांना सात वर्ष ठेवण्यात आलं होतं. हा नियतीचा एक वेगळाच योगायोग होता. तुरुंगातून सुटल्यावर ज्या चळवळीची स्थापना केली त्यासाठी नेटाने लढत राहिले. जीवनाचा कोणताही क्षण त्यांनी माओवादी, मार्क्स, लेनिनच्या विचारसरणीच्या पलीकडे जाऊन केला नाही व ते फक्त उत्तर बंगालमध्ये राजकीयदृष्टय़ा कार्यरत राहिले. २००६ साली त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिल्लीला जाणारी राजधानी एक्स्प्रेस अडवली, तेव्हा त्यांचे वय ७४ होते. त्या वेळी त्यांना अटक झाली होती. सिंगुरमध्ये टाटांच्या नॅनो कारसाठी जो कारखाना उभारण्यात आला होता त्याच्या विरोधातही त्यांनी आंदोलन केले.

सातत्याने आंदोलने व सरकारविरोधात लढत राहणारा हा मनुष्य एक विचारवंतच होता. भारताचा लेनिन बनण्याची त्यांच्यात क्षमता होती असं त्यांचे अनेक मित्र म्हणतात.

कनु सन्यालसारखा क्रांतिकारी मनुष्य वयाच्या ७८व्या वर्षी आत्महत्या करतो हे आश्चर्यकारक आहे. त्यांच्यावर प्रेम करणारे व त्यांच्या विचारधारेला मानणाऱ्या अनेक लोकांचा भ्रमनिरास झाला आणि बऱ्याच जणांना कनु सन्याल यांनी आत्महत्या केली नसावी असे वाटले.

शोषण, पराकोटीच्या भांडवलशाहीच्या आहारी जाणे, अमेरिकाकेंद्रित धोरण बनवणे यांमुळे संपूर्ण आशिया खंडामध्ये भारताने आपले महत्व गमावले आहे. चीनसारख्या महासत्तेबरोबर भारताची तुलना केली जाते, ती अवाजवी आहे. कनु सन्याल व त्याच्या सहकाऱ्यांना वाटत होते की, माओ झेडॉंग यांच्या नेतृत्वाकाली जी क्रांती चीनमध्ये झाली त्यामुळे चीनची देदीप्यमान अशी प्रगती होईल.

पण चीनची खरी प्रगती डेंग या माओच्या सहकाऱ्याने केली. डेंग व्यक्तीपूजेचे समर्थक नसून विरोधकच होते. डेंगने स्वत:चे चित्रसुद्धा कुठे लागू दिलं नाही. ह्याउलट माओचे होते. इथे आपण कनु सन्यालबद्दल विचार करीत असताना एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे की माओच्या विचारसरणीत योग्य ते बदल करून चीन कुठल्या कुठे निघून गेला. चीनच्या तुलनेत भारत आशियात कुठेही नाही.

आता आपल्याकडचे शासनाचे अर्थतज्ज्ञ असं पुन:पुन्हा सांगतात की, चीन व भारत ह्यांच्यामध्ये खरी स्पर्धा आहे. शून्य. चीन व भारतामध्ये कुठलीही स्पर्धा होऊ शकत नाही. चीनने ऑलिम्पिकमध्ये जी पदकं मिळवली व ज्याप्रमाणे सामने आयोजित केले त्यामुळे अमेरिकेचे डोळेसुद्धा दिपले. १९वे शतक जसे इंग्लंडचे होते, २०वे शतक जसे अमेरिकेचे होते तसे २१वे शतक चीनचे असणार हे कनु सन्याल यांच्या दृष्टीने बरोबर ठरले.

हे खरे ठरत असताना गांधीजींची स्वप्नं धुळीला मिळालेली आहेत. भारतातल्या शोषित, पीडित, आदिवासी, दलित ह्यांचा अंत्योदय व्हायला पाहिजे असे गांधीजी म्हणाले होते. आता तर भारत संघराज्य म्हणून एकत्र टिकून राहणं अवघड होत चाललं आहे. चलनवाढीचा दर प्रचंड वाढत चाललाय. महागाई पराकोटीची वाढली आहे. अशा पार्श्वभूमीवर आजही नक्षलवादी चळवळ सुरू आहे. या चळवळीच्या सध्याच्या कारवायांचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येणार नाही. परंतु गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर आणि अशा ठिकाणांहून येणारा आदिवासी, शेतकरी यांना मंत्रालयातला कक्ष अधिकारीसुद्धा विचारत नाही. याउलट धनाढय़ थैलीशहा, बिल्डर यांना मंत्रीपण अदबशीरपणे वागवून त्यांच्या फाईल्स क्लिअर करतात.

अशा वेळी कनु सन्यालची आठवण येते. ज्वालामुखीसारखा आहेरे विरुद्ध नाहीरेचा संघर्ष पराकोटीला पोहोचलेला आहे. अमेरिकेची लोकशाही ते सुभाषबाबूंचं बंड या लोकशाहीसाठी दिलेल्या सशस्त्र चळवळीच तर होत्या. गांधीजींना सुद्धा मिठाचा सत्याग्रह सोडला तर दुसरा कोणताही लढा अहिंसक करता आला नाही. नाविकांचे बंड हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीचा कळस होय. अशा स्थितीत कनु सन्यालसारख्या अद्वितीय माणसाला आपण चुकीचं कसं ठरवू शकतो.

७८ व्या वर्षी कनुंनी केलेली आत्महत्या ही आपली सगळ्यांची आत्महत्या आहे. भारताची लोकशाही हा आता मूठभर लोकांनी पसरवलेला भ्रम आहे. सरकारी कार्यालयांत आपल्यापैकी कोणी सामान्य जातो तेव्हा मनातल्या मनात एक तर तो खून करतो किंवा आत्महत्या. कनुंमध्ये ७८ व्या वर्षी आत्महत्या करण्याएवढा आत्मसन्मान होता, जो आपल्यात नाही.

म्हणूनच कनुंना अखेरचा लाल सलाम!

lokprabha@expressindia.com